

**Dr. Minakshi Nalbale - Bhosale**

MBBS, MS (General Surgery), DNB(General Surgery);

**MCh ( Pediatric Surgery)**

B/15, Ajinkya Nagari,Behind

Spencer's Daily, Karvenagar, Pune - 411052

Phone No : 9325427226

Email ID : minakshi_dr@rediffmail.com

Web :- www.childsurgerypune.com (under construction)

# बालकांसाठीचे प्रथमोपचार

लहान मुलांच्या बाबतीत अपघात व इजा वरचेवर घडत असतात. या लेखात अशा वेळी करावयाच्या काही उपायांचे मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न आहे. प्रथमोपचाराच्या तंत्राच्या माहितीमुळे आपण छोट्या मुलांना वेदनेपासून मुक्ती देऊ शकतो आणि एखाद्या बालकाचा जीवसुद्धा वाचवू शकतो.

भाजणेः चार वर्षे वयोगटातल्या मुलांमध्ये भाजणे ही खूप वेळा होणारी घटना असते. अशा वेळी बालकाला ज्या वस्तुमुळे भाजले ती प्रथम दूर करा. नळाचे थंड पाणी भाजलेल्या भागावर सोडा. भाजलेले कपडे काढा. साधे स्वच्छ जंतूनाशक लावा व पुढील उपचाराकरता डॉक्टरांकडे घेऊन जा.

**डोक्याला होणारी इजाः** डोक्याला मार बसणे अथवा इजा पोहोचणे ही दोन वर्षे वयोगटापर्यंतच्या बालकांबाबतीत सर्वसाधारणतः घडणारी समान घटना आढळून येते. सुदैवाने या पैकी ८५ % घटना किरकोळ स्वरुपाच्या असतात. तरी पण अगदी छोट्या घटनेनंतर सुद्धा बालकाचे ४ ते ६ तास काळजीपूर्वक निरिक्षण करावे. डोक्याला मार बसल्यानंतर मूल बेशुद्ध होणे, आकडी येणे, मंद होणे, पेंगुळणे (झोपाळणे) किंवा वारंवार उलटी होणे अशी लक्षणे आढळल्यास तातडीने डॉक्टरांकडे घेऊन जावे.

**दात तुटणे, पडणेः** अपघातानंतर दात तुटणे, पडणे घडू शकते. दात पडलेल्या ठिकाणी झालेल्या जखमेवर स्वच्छ कापड ठेऊन रक्तस्त्राव कमी करावा. निघालेला दात एका पेल्यात दुधात ठेऊन मोठ्या मुलांच्या बाबतीत निघालेल्या ठिकाणी बसविण्याचा प्रयत्न करावा. दंतवैद्याकडे मुलाला लवकरात लवकर घेऊन जावे.

**नाकातून रक्त येणेः** नाकाचे टोक (खालचा भाग), नाकाचा शेंडा दाबून धरल्याने रक्तस्त्राव थांबवता येऊ शकतो. अशा वेळी पुढे झुकल्यामुळे बालकाचा जीव त्याच्या स्वतःच्या रक्तस्त्रावामुळे गुदमरण्यापासून वाचू शकतो.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilizing the information.*

© *Arogyadarpan.com*

**विजेच्या शॉकमुळे भाजणेः** ही घटना क्षुल्लक वाटली तरी धोकादायक ठरु शकते. विजेच्या शॉकमुळे भाजले तर तातडीने विजेचा प्रवाह बंद करावा आणि मुलाला विजेच्या स्त्रोतापासून लाकडासारख्या वीजनिरोधक वस्तुच्या सहाय्याने दूर करावे.

**फीट किंवा आकडी येणेः** ६ महिने ते ५ वर्षे वयाच्या मुलांमध्ये, त्यांना आलेला ताप झटकन वाढला तर ३ ते ४ मिनिटांसाठी छोट्या प्रमाणात फीट येणे आढळून येते. जास्त तापावर त्यांना ॲसेटॅमिनोपेन /इल्युप्रोफेन आणि / किंवा कोमट पाण्याने अंग पुसणे असा उपचार द्यावा.

**मोठी फीटः** मुलाला मोठ्या प्रमाणात फीट आली तर, त्याची जीभ श्वासनलिकेवर पडून श्वसनाला अडथळा येऊ नये म्हणून त्याच्या तोंडात काहीतरी (दाताखाली) ठेवावे. यामुळे जीभ चावली जाण्याचा धोका संभवत नाही.

**गुदमरणेः** धान्याचे दाणे, फळांच्या बिया अशांसारख्या वस्तूमुळे मूल गुदमरु शकते. अशा वस्तू काढण्यासाठी त्याच्या पाठीवर बुक्के मारावेत, पोटावर धक्के द्यावेत. एकदा वस्तू तोंडात आली की हाताच्या बोटांनी ती बाहेर काढावी.

**बुडणेः** मोठी मुले बरेचदा पोहोण्याचा तलाव, तळे अशा मोठ्या पाणीसाठ्यांमध्ये बुडू शकतात परंतु लहान मुले बाथटब किंवा पाण्याच्या बादलीतसुद्धा बुडू शकतात. मुलाला एकदा पाण्यातून बाहेर काढले की मदतीसाठी ओरडा करावा व जरुर असेल तर हृदयक्रिया सुरु होण्यासाठी प्रयत्न (cardio-pulmonary resuscitation)करावेत. मूल जरी पूर्ववत झाले तरीही वैद्यकीय मदत ताबडतोब घ्यावी.

**विषबाधाः** तुमचे मूल जर विषारी पदार्थांच्या संपर्कात आले असेल आणि कोणताही प्रतिसाद देत नसेल तर पहिली गोष्ट म्हणजे मुलाला अशा दुर्घटनाग्रस्त ठिकाणापासून दूर करा. मुलाचे शरीर संपूर्ण स्वच्छ करा म्हणजे त्याला ते जास्त दुषित होणार नाही. ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या. ज्यामुळे विषबाधा झाली तो पदार्थ नीट राखून ठेवा म्हणजे त्यानुसार मुलाला उपचार देणे सोपे होईल.

**चावे आणि दंशः**

**जनावरांनी घेतलेले चावे -** लहान ओरखडे असतील तर तो भाग साबण व पाणी वापरुन स्वच्छ धुवा आणि निर्जंतुक मलम तेथे लावा. मात्र जास्त गंभीर चावे असतील तर डॉक्टरांनाच त्याची परीक्षा करु द्या.

**सर्पदंशः** दंश झालेली जागा साबण व पाण्याने धुवा व त्या जागेची हालचाल थांबवा तसेच हृदयापासून ती जागा खालच्या पातळीवर ठेवा. तातडीने वैद्यकीय मदत घ्या. महत्वाची गोष्ट म्हणजे अजिबात वेळ न घालवता रुग्णालयाकडे धाव घ्या.

**कोळीदंशः** दंश झालेली जागा साबण व पाण्याने धुवा. २० मिनीटेपर्यंत दंश झालेल्या ठिकाणी बर्फ ठेवा.

**मधमाशीदंशः** दंश झालेल्या ठिकाणी बर्फ आणि/किंवा पाणी व बेकिंग सोडा यांचे मिश्रण (मलम) लावा.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilizing the information.*

© *Arogyadarpan.com*